महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव

# आवाज

संपादक : भगवान सोनवणे

WWW.DAILYAWAZ.COM

RNI Reg. No.: MAHMAR/2014/66104 ■ वर्ष - १३ वे ■ अंक क्र. - ४० ■ सोमवार, दि. १७ ऑगस्ट २०२६ ■ किंमत - १ रूपया ■ पाने - ४

✲ उत्सुकता ✲




## कोपरगाव येथील गोदावरी नदीपात्रात अवैध वाळू वाहतुकीविरुध्द गुन्हे शाखेची कारवाई
## ५,१०,०००/- रु. किमतीचा मुद्देमाल जप्त

**दै. आवाज वृत्तसेवा...**

कोळपेवाडी प्रतिनिधी:- पोलीस अधीक्षक अहिल्यानगर मुम्मका सुदर्शन पोलीस अधीक्षक अहिल्यानगर यांनी स्थानिक गुन्हे शाखेस अहिल्यानगर जिल्ह्यातील अवैध वाळु वाहतुकीविरुध्द कारवाई करणेबाबत आदेशित केले आहे नमुद आदेशान्वये स्थानिक गुन्हे शाखा अहिल्यानगर पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी पोलीस अंमलदार अतुल लोटके, निळकंठ कारखेले, रणजीत जाधव, योगेश कर्डीले व दिपक जाधव यांचे पथक तयार करुन अवैध वाळु उपसा व वाहतुक करणारे इसमांविरुध्द कारवाई करणेकामी रवाना केले असता १२ ऑगस्ट रोजी पथक कोपरगाव तालुका पोलीस ठाणे हद्दीमध्ये अवैध वाळु वाहतुक करणाऱ्यांची माहिती काढत असताना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की सांगवी भुसार गावचे शिवारातील गोदावरी नदी पात्रातून इसम नामे सम्यक बाळासाहेब मेहरखांब हा वाळु उपसा करुन वाळुची वाहतक करत आहे.

मिळालेल्या माहितीवरून पथकाने पंचासमक्ष गोदावरी नदीपात्राजवळ जाऊन खात्री केली असता एक इसम निळे रंगाचे पॉवरट्रॅक कंपनीचे ट्रॅक्टर व ट्रॉलीमधुन वाळु भरुन निघण्याचे तयारीत असता मिळून आला वाहन चालकास ट्रॅक्टर थांबवून पोलीस पथक व पंचाची ओळख सांगुन ट्रॅक्टरचे ट्रॉलीची तपासणी केली असता त्यात वाळु मिळून आल्याने सम्यक बाळासाहेब मेहेरखांब वय २० रा.सांगवी भुसार ता.कोपरगाव जि.अहिल्यानगर यास ताब्यात घेतले. ताब्यातील आरोपीचे कब्जातून ५,००,०००/- रू किं. त्यात विना क्रमांकाचा ट्रॅक्टर व ट्रॉली व १०,०००/- रू किं. वाळु असा एकुण ५,१०,०००/- रू किं.मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीविरुध्द कोपरगाव तालुका पोलीस स्टेशन गु.र.नं. ३४२/२०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३(२) सह पर्यावरण संरक्षण अधिनियम कलम ३, १५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड कोपरगाव तालुका पोलीस स्टेशन हे करीत आहे.

ही कारवाई मुम्मका व सुदर्शन पोलीस अधीक्षक अहिल्यानगर यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केलेली आहे पोलीस अधीक्षक अहिल्यानगर यांनी स्थानिक गुन्हे शाखेस अहिल्यानगर जिल्ह्यातील अवैध वाळु वाहतुकी विरुध्द कारवाई करणेबाबत आदेशित केले आहे नमुद कारवाई ही मुम्मका सुदर्शन, पोलीस अधीक्षक अहिल्यानगर अप्पर पोलीस अधीक्षक श्रीरामपूर सोमनाथ वाकचौरे उपविभागीय पोलीस अधिकारी शिर्डी अमोल भारती यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केल्याने वाळू तस्करामध्ये पोलीस कारवाईची चांगलीच दहशत पसरली आहे.





वाढदिवस शुभेच्छा, जुने/नवे वाहन खरेदी/विक्री, घर/जमीन खरेदी विक्री, उद्घाटन सोहळा तसेच आपल्या फर्मची जाहिरात करा सवलतीच्या दरात

✲ संपर्क ✲ ९५४५९ १०१७७






श्री संत सेवालाल महाराज सेवाभावी संस्था, संचलित

**श्री पिनाकेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय**

(पुणे विद्यापीठ संलग्न)

वसंतनगर, पो. जातेगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक-४२३१०६

✲ शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून

B.A./B.Com/B.Sc साठी प्रवेश देणे सुरू आहे.

प्रवेश पात्रता - १२ वी पास (आर्टस्, कॉमर्स, सायन्स)




✲ वैशिष्टे ✲
- ✲ उच्च शिक्षित प्राध्यापक वर्ग
- ✲ भव्य प्रशासकीय व महाविद्यालय इमारत
- ✲ सि.सि.टि.व्ही. कॅम्पस
- ✲ ग्रथालय व वाचनालय स्वतंत्र इमारत
- ✲ मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतीगृह सुविधा
- ✲ भव्य सेमिनार हॉल व खेळाचे मैदान
- ✲ मर्यादित विद्यार्थी संख्या

प्रवेशासाठी संपर्क :- ९९२२१७२७९९

पत्ता - कै. गंगाराम धनसिंग राठोड शैक्षणिक संकुल, महादेव रोड, वसंत नगर, पो.जातेगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक.

✲ प्राचार्य :- मोबा. 9922172799






# कोळपेवाडी रयत संकुलात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

## दिमाखदार संचलन, तिरंगा सायकल रॅली व वृक्षारोपणाने देशभक्तीचा जागर

**दै. आवाज वृत्तसेवा...**

कोळपेवाडी प्रतिनिधी:- रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, मौजे सुरेगाव, पोस्ट कोळपेवाडी येथे भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिन उत्साहपूर्ण व देशभक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. याप्रसंगी निपुण बालविवाह विरोधी पॉश ऍक्ट २०१३ ची प्रतिज्ञा सर्व विद्यार्थ्यांनी व सेवकांनी घेतली विद्यालयाचे प्राचार्य श्री. प्रकाश चौरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी प्राचार्य चौरे यांनी स्वातंत्र्यसैनिक व क्रांतिकारकांच्या त्यागाचे स्मरण करून राष्ट्रध्वजाचे महत्त्व विशद केले. उपस्थित विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व ग्रामस्थांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.
यावेळी प्रभात फेरी काढण्यात येवुन विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.

यानंतर श्री छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या भव्य प्रांगणात श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, राधाबाई काळे कन्या विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय आणि श्री छत्रपती संभाजी प्राथमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे नवनियुक्त व्हाइस चेअरमन श्री. दिनार पद्मकांत कुदळे यांच्या हस्ते राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.
यावेळी दिनार कुदळे यांनी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा देत विद्यालयातील शिस्त, विद्यार्थ्यांचा उत्साह आणि कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन यांचे कौतुक केले.
स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व राधाबाई काळे कन्या विद्यामंदिरच्या एन.सी.सी. व स्काऊटच्या विद्यार्थ्यांनी श्री. बाळासाहेब मेहेरे यांच्या मार्गदर्शनाखाली दिमाखदार संचलन करून राष्ट्रध्वजास मानवंदना दिली. विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध संचलनाने उपस्थितांची मने जिंकली. यावेळी विद्यार्थ्यांनी सामूहिक कवायतही सादर केली.



कार्यक्रमास रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य श्री. अरुण चंद्रे, विद्यालयाचे प्राचार्य श्री.प्रकाश चौरे, स्थानिक स्कूल कमिटी सदस्य मा. हेमंत वाबळे शिवाजीराव वाबळे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कचरू कोळपे, बाळासाहेब ढोमसे, राधाबाई काळे कन्या विद्यालयाच्या प्रभारी मुख्याध्यापिका सौ. नीता केदार, संभाजी प्राथमिक विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक श्री. शिंदे सर, उपमुख्याध्यापक देविदास माने, पर्यवेक्षक सचिदानंद झावरे व किरण चांदगुडे तसेच डॉ.आय के. सय्यद, श्री.निळकंठ सर, सुनील मोकळ, आबासाहेब आभाळे, सर्जेराव कुऱ्हाडे, सतीश नरोडे, मंगेश औताडे, तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर, ग्रांमस्थ, पालक, शिक्षक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. तसेच 'हर घर तिरंगा अभियान' अंतर्गत विद्यालयात निबंध व वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. दिनांक १३ ऑगस्ट रोजी भव्य तिरंगा सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.
कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री. अशोक गांगुर्डे, गुरुकुल प्रमुख श्री. योगेश सावळा, क्रीडा शिक्षक श्री. देवेंद्र भोये व श्री. विठ्ठल वसावे, तसेच श्री. नितीन निकम, श्री. रवींद्र सानप, श्री. दीपक गावित, श्री. गणेश घोडके, श्री. योगेश महामिने, सौ. रोहिणी म्हस्के व सौ. स्मिता पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभले.
कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. रजामुराद शेख यांनी केले, तर श्री. किरण चांदगुडे यांनी आभार मानले.

दिमाखदार संचलन, सामूहिक कवायत, वृक्षारोपण, तिरंगा सायकल रॅली आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे कोळपेवाडी रयत संकुलातील स्वातंत्र्य दिन सोहळा उत्साहात व दिमाखात संपन्न झाला.

## राजापूर येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**दै. आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी येवला तालुक्यातील राजापूर स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत व्यवस्थापन समितीचे सदस्यांनी ध्वज पूजन केले तर ध्वजारोहण समितीचे शरद आव्हाड यांनी केले . ज्ञानप्रकाश आश्रम शाळेचे ध्वजारोहण उपसरपंच नामदेव पवार यांनी केले पर्णकुटी जय जवान जय किसान ग्रुपचे ध्वजारोहण सेवानिवृत्त सैनिक योगेश मुंडे व नितीन वाघ यांनी केले ग्रुप ग्रामपंचायतीचे ध्वजारोहण सरपंच लताबाई जाधव यांनी केले विकास सोसायटीचे ध्वजारोहण चेअरमन मच्छिंद्र चव्हाण यांनी केले, माध्यमिक विद्यालयाचे ध्वजारोहण सुरेखा लोधे,वाघ यांनी केले वाघ वस्ती शाळेचे ध्वजारोहण दीपक अलगट यांनी केले. राजापूर वन विभागातील ध्वजारोहणवन समितीचे गोरख सानप यांनी केले राजापूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे ध्वजारोहण वैद्यकीय अधिकारी अक्षय नवगिरे यांनी केले. अलगट वस्तीशाळेचे ध्वजारोहण शांताराम अलगट यांनी केले हवालदार वस्ती शाळेचे सैनिक गणेश वाघ यानी केले.
नाईक वस्ती शाळेची ध्वजारोहण नवनाथ अलगट यांनी केलेभैरवनाथ वाडी शाळेचे ध्वजारोहण सेवानिवृत्त सैनिक शांताराम भोरकडे यांनी केले गणाधीश इंटरनॅशनल स्कूल या विद्यालयाच्याशाळेचे ध्वजारोहण प्रज्वल धात्रक यानी. केले तर माध्यमिक विद्यामंदिर राजापूर या विद्यालयाचे ध्वजारोहण कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी येवला तालुका मराठी पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष लक्ष्मण घुगे होतेशिष्यवृत्ती व खेळामध्ये प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार संस्थेचे संचालक संपत वाघ व रमेश वाघ यांनी केला यावेळी गावातील आजी-माजी सरपंच उपसरपंच सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते

## सातबाभळ येथील शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप

**दै. आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण पवार, हतगड...खामखेडा ता देवळा येथील जनता विद्यालयातील सन १९९८ च्या इयत्ता दहावीच्या वर्ग मित्रांनी सातबाभळ ता सुरगाणा येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप केले. यावेळी सर्व उपस्थित मित्रांची ओळख उपशिक्षक खंडू मोरे यांनी करून दिली. शाळेच्या वतीने शाळास्तरावर राबविण्यात येत असलेले उपक्रम यावेळी मुख्याध्यापिका कुसुम राउत यांनी उपस्थितांना सांगितले. शाळेच्या वतीने सैन्य दलात कार्यरत असलेले शरद शेवाळे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सर्व उपस्थित



मित्रांनी शाळेतील शिक्षक कुसुम राऊत व खंडू मोरे यांचा सन्मान करत विद्यार्थ्यांना वहया, पेन, पेन्सिल पॅड,चित्रकला वही यांसह इतर शैक्षणिक साहित्य वितरित केले.कार्यक्रमास जगदीश अहिरे, शरद शेवाळे, जालिंदर सूर्यवंशी, जयवंत शेवाळे, दीपक बिरारी, सचिन हिरे, दीपक बोरसे, जयप्रकाश जगताप, सुनील मोरे, शरद मोरे नानाजी वाघ, सिकंदर आहेर, त्र्यंबक बोरसे उपस्थित होते.

## राजापूर येथे अखंड हरिनाम सप्ताह

**दै. आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी. येवला तालुक्यातील राजापूर येथील भैरवनाथ वाडी येथील काल भैरवनाथ मंदिर येथे सालाबादप्रमाणे यावर्षीही अखंड हरिनाम सप्ताह व श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा दिनांक श्रावण शुक्ल मंगळवार दिनांक १८ ऑगस्ट २०२६ ते २५ ऑगस्ट २०२६ पर्यंत आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात पहाटे ४ ते ६ काकडा भजन सकाळी ८ ते १२ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी ४ ते ५ प्रवचन सायंकाळी ५ते ६ हरिपाठ रात्री ६ ते ८ हरिकीर्तन नंतर महाप्रसादाचा कार्यक्रम व अखंड विना जागर कार्यक्रम असे दैनंदिन कार्यक्रम आठ दिवस ठेवण्यात आले आहे.सदर प्रसंगी महाराष्ट्रातील अनेक नामवंत प्रवचनकार दि. १८रोव कीर्तनकार यांचे हरि कीर्तनाचेआयोजन भैरवनाथ वाडी राजापूर ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे. अखंड हरिनाम सप्ताहाचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आव्हान राजापूर भैरवनाथवाडी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

## महर्षी वेदव्यास राष्ट्रीय गुरु गौरव पुरस्काराने योगगुरू बाळासाहेब मोकळ सन्मानित

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नांदगाव : मारुती जगधने योग क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य आणि गेल्या २३ वर्षांपासून योगाचा प्रचार व प्रसार करण्यासाठी सातत्याने कार्यरत असलेले योगगुरू बाळासाहेब मोकळ यांना 'महर्षी वेदव्यास राष्ट्रीय गुरु गौरव पुरस्कार २०२६/२७' या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने नंदुरबार येथे सन्मानित करण्यात आले. नैसर्गिक मानवाधिकार सुरक्षा परिषद फोरमच्या वतीने आयोजित कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. योगाचा प्रचार व प्रसार करून अधिकाधिक लोकांना योगसाधनेसाठी प्रेरित करण्याचे कार्य बाळासाहेब मोकळ गेल्या २३ वर्षांपासून करीत आहेत. योगदर्शन




योग केंद्राच्या माध्यमातून त्यांनी अनेक योगशिक्षक घडविले असून शाळा, महाविद्यालये व विविध सामाजिक संस्थांमध्ये योगाचा प्रसार केला आहे. योगाबद्दल जनजागृती आणि लोकांना प्रेरणा मिळावी यासाठी त्यांनी विविध उपक्रम राबविले असून योग क्षेत्रात पाच विश्वविक्रमहीप्रस्थापितकेलेआहेत.त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांना हा राष्ट्रीय सन्मान प्रदान करण्यात आला. कार्यक्रमास मा. डॉ.ज्योती लष्करी , मा. श्री. विशाल गावित, मा. डॉ. सुनील पी. सावंत, मा. श्री. गोरख देवरे, मा. डॉ. राकेश अशोक रामराजे आणि मा. श्री. सारंग शेठ भावसार आदी मान्यवर उपस्थित होते. या पुरस्काराबद्दल योगगुरू बाळासाहेब मोकळ यांचे विविध क्षेत्रांतून अभिनंदन होत आहे.

## धारणगाव येथे दुचाकीच्या समोरासमोर धडकेत एकाचा मृत्यू तर एक गंभीर

**दै. आवाज वृत्तसेवा...**

कोळपेवाडी प्रतिनिधी :- कोपरगाव तालुक्यातील धारणगाव येथे कोपरगाव-कोळपेवाडी प्राजिमा ८५ मार्गावर रणशूर स्मारकाजवळ दोन मोटारसायकलींची समोरासमोर जोरदार धडक होऊन अपघातात कोळगाव सांगवी (सिन्नर ) बाळासाहेब दामू घुमरे यांचा मृत्यू झाला असून ते घुमरे हे शेतीच्या कामासाठी बियाणे घेऊन जात असताना कोळपेवाडी येथून कोपरगावच्या दिशेने जाणारे अनिल खाजेकर जात होते या भीषण धडकेत बाळासाहेब घुमरे यांचा मृत्यू झाला, तर अनिल खाजेकर यांच्या डोक्याला आणि पायाला गंभीर दुखापत झाली आहे. त्यांना पुढील उपचारासाठी कोपरगाव येथे दाखल करण्यात आले आहे. दरम्यान या अपघातामुळे कोपरगाव-कोळपेवाडी मार्गावरील सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे या मार्गावर अनेक ठिकाणी गती अवरोधक नसल्याने वेगवान वाहने समोरासमोर येऊन अपघात होतात काही दिवसापूर्वी या ठिकाणी अज्ञात वाळू वाळवणाच्या धडकेत कोळगाव थडी येथील तरुणाला जीव गमवावा लागला होता. या मार्गावर वाळूचे अवैध डंपर वेगवान गतीने कोपरगाव कडे मार्गस्थ होताना रस्त्यावर वाळू सांडुन दुचाकी वाहनाचा अनेक वेळा अपघात झालेला आहे असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, भगवान नामदेव सोनवणे यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव बस स्टँड समोर, मालेगांव येथे छापून ढासे मळा, सावता नगर, नांदगांव ता.नांदगांव, जि.नाशिक येथे प्रकाशित केले. सहसंपादक भाऊसाहेब हुजबंद. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या, लेख, जाहिराती यामधून व्यक्त झालेल्या मतांशी मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक, सहसंपादक सहमत असतीलच असे नाही. मुद्रण दोष संभवनीय. (नांदगांव न्यायकक्षेत) सर्व अधिकार सुरक्षित. मो. ९५४५९१०१७७ - ९२७२४५३९२१ email : nandgaonawaz@gmail.com

# पातोंडा विकास सोसायटी चेअरमनपदी विष्णू रोकडे यांची बिनविरोध निवड



**दै. आवाज वृत्तसेवा...**

पातोंडा प्रतिनिधी - बुधवार दि. १२/ ८/ २६ रोजी पातोंडा विकास सोसायटीचे नुकतेच चेअरमन व व्हा. चेअरमन निवड सहकार अधिकारी श्री नितीन पाटील साहेब यांच्या उपस्थितीत संस्थेच्या कार्यालयातील संपन्न झाली. सदर निवडीत चेअरमन म्हणून श्री विष्णू नामदेव रोकडे यांची बिनविरोध निवड झाली.

तसेच श्री विजयकुमार रघुनाथ माळी उर्फ बालू महाजन यांची सलग तिसऱ्यांदा व्हा. चेअरमन पदी निवड करण्यात आली. नवनिर्वाचित चेअरमन, व्हा. चेअरमन यांना मा. सभापती तात्यासो संजय भास्कर पाटील यांनी दोघांचे स्वागत करून पुढील कामासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी सोसायटीचे सचिव मोहन सोनवणे संस्थेचे ज्येष्ठ संचालक कौतिक जगन्नाथ माळी (सावता महाराज) श्रीमती सुमनबाई रामदास पाटील, सुधाकर बापूराव देशमुख, राजेंद्र लक्ष्मण धनगर, संजय विठ्ठल अहिरे, सुभाष मांगू माळी, विजय पांडुरंग माळी, विश्वास रामदास माळी, कैलास नामदेव झगडे, इत्यादी संचालक व कर्मचारी तसेच गावातील सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहून सर्वांनी पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्यात.

# मोरेवाडी जि.प.शाळेत स्वातंत्र्यदिन साजरा



**दै. आवाज वृत्तसेवा...**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मोरेवाडी (कासारी) येथे भारताचा ८०स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

सर्वप्रथम तिरंगा रॅली काढून देशभक्तीपर घोषणा देण्यात आल्या. शाळेचे ध्वजारोहण मोरेवाडी येथील प्रगतशील शेतकरी ह.भ.प.समाधान सुकदेव मोरे यांच्या हस्ते करण्यात आले.याप्रसंगी राष्ट्रीय ध्वजास सलामी देऊन राष्ट्रीय गीत वंदे मातरम्,राष्ट्रगीत, राज्यगीत, ध्वजगीत सादर करण्यात आले.देशभक्तीपर कवायतीचे संचालन करण्यात आले.तंबाखूमुक्त सामुदायिक शपथ घेण्यात आली.माननीय अन्न-सुरक्षा आयुक्त अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य यांच्या पत्राचे वाचन करून शाळेच्या आवाराच्या ५० मीटर हद्दीत जंक फूड विक्रीचा कोणताही स्टॉल व दुकान नसल्याचे जाहीर करण्यात आले व विद्यार्थ्यांना संतृप्त चरबी, ट्रान्सफॅट, अतिरिक्त साखर असलेल्या पदार्थांचे सेवन न करण्याबाबत सांगण्यात आले.याप्रसंगी प्रमुख पाहुणे समाधान मोरे यांनी विद्यार्थ्यांना अंकलिपी व पेन या शैक्षणिक साहित्याचे वाटप केले,तर शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष काभू रतन मोरे व उपाध्यक्ष साहेबराव गुलाब कर्नर यांच्यामार्फत विद्यार्थ्यांना फरसाण, मोतीचूरचे लाडू, चॉकलेट या खाऊचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास मोरेवाडी येथील सर्व प्रतिष्ठित नागरिक,ग्रामस्थ,शालेय व्यवस्थापन समितीची सर्व कार्यकारणी, अंगणवाडी कार्यकर्ती, मदतनीस, स्वयंपाकी, व विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक बागुल सर यांनी केले तर उपशिक्षिका योगिता कापुरे मॅडम यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# नांदगाव येथे संत सावता महाराज अखंड हरिनाम सप्ताहाची भक्तिमय सांगता

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नांदगाव : मारुती जगधने - नांदगाव येथे संत शिरोमणी सावता महाराज अखंड हरिनाम सप्ताहाची सात दिवसांच्या भक्तिमय वातावरणानंतर १२ ऑगस्ट रोजी सांगता झाली. सांगता समारंभानिमित्त आयोजित काल्याच्या कीर्तनाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. श्रीकृष्णाच्या विविध लीलांचे प्रभावी चित्रण आणि कीर्तनातून केलेले आध्यात्मिक निरूपण यामुळे उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले.



सांगता सोहळ्याचे दृश्य अत्यंत मनमोहक आणि भक्तिभावाने भारावलेले होते. भव्य मंडपात हजारो वारकरी, भाविक आणि नागरिक उपस्थित होते. महिला-पुरुषांनी पारंपरिक पोशाख परिधान करून मोठ्या संख्येने सहभाग घेतला. पांढरे कुडते-पायजमे, गांधी टोपी, पारंपरिक फेटे तसेच महिलांच्या रंगीबेरंगी साड्यांमुळे संपूर्ण परिसराला वारकरी संस्कृतीचे पारंपरिक रूप प्राप्त झाले होते. सांगता दिनी सुमारे १० हजार भाविकांनी महाप्रसाद तसेच कीर्तनाचा लाभ घेतल्याची माहिती देण्यात आली.

सात दिवस अखंड नामस्मरण, भजन, कीर्तन आणि धार्मिक कार्यक्रमांमुळे परिसरात निर्माण झालेले भक्तिमय वातावरण सांगता सोहळ्याच्या दिवशी अधिकच उत्कट झाले. काल्याच्या कीर्तनाने रंगला सांगता सोहळा सप्ताहाच्या सांगतेनिमित्त काल्याचे कीर्तन आयोजित करण्यात आले होते. श्रीकृष्णाच्या विविध लीलांचे चित्रण, भक्ती, नामस्मरण आणि अध्यात्माचा संदेश यामुळे कीर्तनाला विशेष रंगत आली. व्यासपीठासमोर मोठ्या संख्येने वारकरी आणि भाविक शांतपणे बसून कीर्तन ऐकत होते. टाळ-मृदंगाच्या गजरासह हरिनामाच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. कीर्तन आणि धार्मिक कार्यक्रमांसाठी भव्य मंडपाची व्यवस्था करण्यात आली होती. पिवळ्या आणि हिरव्या रंगाच्या कापडी छताने सजविलेल्या मंडपात व्यासपीठ, ध्वनिक्षेपक आणि माईकची व्यवस्था करण्यात आली होती. मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहणार असल्याने आयोजन समितीने शिस्तबद्ध नियोजन केले होते. संत सावता महाराज उत्सव समितीचे नियोजन संत सावता महाराज उत्सव समितीच्या वतीने झाली

# पेडकाई माता सामाजिक शैक्षणिक संस्थेचे माध्यमिक विद्यालय, साकोरे येथे ८० वा भारतीय स्वातंत्र्य दिन दिमाखात साजरा

**दै. आवाज वृत्तसेवा...**

भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात व देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. स्वातंत्र्य दिनानिमित्त विद्यालयाच्या प्रांगणात स्कुल कमेटी चेरमन श्री. रमेश झेला बोरसे यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली. या कार्यक्रमास साकोरे गावातील प्रतिष्ठित नागरिक, पालक, माजी विद्यार्थी तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी, आरोग्य सेविका, आशा सेविका, अंगणवाडी सेविका, मदतनीस,ग्रामपंचायत सदस्य, सोसायटी सदस्य, शालेय व्यवस्थापन समिती पदाधिकारी, सदस्य, सखी सावित्री समिती पदाधिकारी सदस्य, मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून संगीतमय कवायत व संचलन सादर केले. विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध संचलनाने उपस्थितांची मने जिंकली. यावेळी उपस्थित सर्व विद्यार्थी व नागरिकांना तंबाखूमुक्त अभियानाची व कॉफि मुक्तीची शपथ देण्यात आली. निरोगी व व्यसनमुक्त समाज घडविण्याचा संदेश यानिमित्ताने देण्यात आला. कार्यक्रमास उपस्थित राहून सहकार्य करणाऱ्या सर्व मान्यवर, नागरिक, पालक व माजी विद्यार्थ्यांचे विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. योगेश पाटील यांनी मनःपूर्वक आभार मानले. कार्यक्रमाचे सुत्र संचलन राजेंद्र भाबड, क्षीरसागर सर यांनी केले. यावेळी सर्व उपस्थितांना भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या. राष्ट्रप्रेम, देशभक्ती आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. अशा प्रकारे माध्यमिक विद्यालय साकोरे येथे ८० वा भारतीय स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात, आनंदात आणि देशभक्तीमय वातावरणात संपन्न झाला.या वेळी विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी व सेवक वृंद उपस्थित होते.



# सारताळे आश्रमशाळेत स्वातंत्र्य दिवस उत्साहात साजरा

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नांदगाव -(वार्ताहर)-आश्रम शाळा, सारताळे ता. नांदगाव येथे आज संस्था अध्यक्ष दर्शन दादा पगार, कोषाध्यक्षा सौ. नम्रता पगार मॅडम, नांदगाव शिक्षण शास्त्र महाविद्यालय प्राचार्य विक्रम घुगे सर , संत गजानन महाराज महाविद्यालय प्राचार्य सुरसे सर यांच्या प्रमुख उपस्थितीत व आश्रम शाळा प्राचार्य समाधान चौधरी यांच्या अध्यक्षतेत भारताचा ८० वा स्वतंत्र दिवस उत्सहात साजरा झाला.संस्था अध्यक्ष श्री दर्शनदादा पगार यांच्या हस्ते ध्व्जारोहन करण्यात आले. वंदे मातरम, राष्ट्रगीत, राज्यगीत व ध्व्जगीता नंतर आश्रम शाळेच्या मुलांनी देशभक्तीपर गीतांच्या तालावर कवायत सादर केली. नंतर आश्रम शाळेच्या मुलींची भाषणे झाली. सदर प्रसंगी विक्रम घुगे व प्राचार्य समाधान चौधरी यांनी स्वातंत्र्य दिनाचा हेतु सांगत समर्थ राष्ट्राची उभारणी ही आजच्या कर्तृत्वान तरुण पिढीच्या हातात असल्याची जाणीव करून देत तरुणांनी शिक्षणाची व व्यवसायाची कास धरावी असे आव्हान केले.'तंबाखु मुक्त शाळा' व 'कॉपी मुक्त परीक्षा'शपथ देण्यात आली.कार्यक्रम प्रास्ताविक अरविंद कोळी यांनी मांडले तर सुत्रसंचालन दिपक सुर्यवंशी यांनी सांभाळले, कवायत संचालण भगवान हिरे यांनी केले तर कार्यक्रम यशस्वीते साठी सर्व शिक्षक, अधीक्षक, अधिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विशेष प्रयत्न केलेत. कार्यक्रमास सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.









# कै.पुंडलिक पांडुरंग मवाळ विद्यालयात स्वातंत्र्य दिवस मोठ्या उत्साहात साजरा

**दै. आवाज वृत्तसेवा...**

पिंपरखेड - आज रोजी विद्यालयात स्वातंत्र्य दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून पिंपरखेड येथील प्रगतिशील शेतकरी तसेच नांदगावरत्न माननीय रामचंद्र सावळीराम सोमवंशी हे होते.त्यांच्या हस्ते आज विद्यालयाचे ध्वजारोहण करण्यात आले. त्याचबरोबर कै.सावळीराम कारभारी सोमवंशी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सोमवंशी परिवाराने विद्यालयाला शुद्ध पिण्याच्या पाण्याचा सव्वा लक्ष रुपयाचा आरो प्लांट सप्रेम भेट दिला त्याचेही उद्घाटन विजय शिक्षण प्रसारक मंडळाचे सरचिटणीस मा.वसंतराव नाना मवाळ यांच्या व संचालक शिवराम आबा कांदळकर, संभाजी नाना मवाळ, शंकर नाना घोटेकर, विलास रामदास जाधव, समाधान अशोक सानप,रामचंद्र सावळीराम सोमवंशी, विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक रावसाहेब रामचंद्र मवाळ, राजेंद्र मवाळ , पोपट चव्हाण, संजय घाडगे, अनिल ठाकरे, बबन जाधव , भाऊसाहेब सोनवणे,सोमनाथ चव्हाण,सागर सानप,विकास भवर, मीननाथ चव्हाण,आबा जगताप,अशोक घाडगे, भिकन जाधव, पीएसआय नितीन चव्हाण वाल्मीक चव्हाण,आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले .

सुरुवातीस गावातून प्रभात फेरी काढण्यात आली. प्रमुख अतिथी मा. रामचंद्र सावळीराम सोमवंशी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. वंदे मातरम, राष्ट्रगीत व राज्यगीतानंतर देशभक्तीपर गीतांवर आधारित सामुहिक कवायत मोठ्या उत्साहात घेण्यात आली त्यास ग्रामस्थांतर्फे मोठा प्रतिसाद देण्यात आला.

त्याचबरोबर विद्यार्थ्यांकडून नशामुक्त भारत शपथ,आमली पदार्थ विरोधी नारे,असाक्षर मुक्त गाव, कॉपी मुक्त परिक्षा अभियान, एक पेड मॉ के नाम,निपूण भारत आदी विषयांवर स्लोगन सादर करण्यात आले.मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपणही करण्यात आले. विद्यालयास आरो प्लांट भेट दिल्याबद्दल दानशूर व्यक्तीमतव मा.रामचंद्र सावळीराम सोमवंशी यांचा शॉल श्रीफळ व बुके देऊन संस्थेचे सरचिटणीस मा. वसंतराव नाना मावळ यांच्या



हस्ते जाहीर सत्कार करण्यात आला.

त्याचबरोबर इतर सत्कारार्थी मध्ये विद्यालयाची संपूर्ण लाईट फिटिंग मोफत करून दिल्याबद्दल मा.ज्ञानेश्वरभाऊ तांदळे तसेच लाईट फीटींगसाठी आर्थिक सहाय्य करणाऱ्या मा.पंडित राऊत, पीएसआय मा.नितीन चव्हाण तसेच आरो प्लांटसाठी रूमची मोफत निर्मीती व साऊंड सिस्टीम चे अनमोल सहकार्य दिल्याबद्दल हनुमंत जाधव या सर्वांचा मान्यवरांच्या हस्ते शॉल श्रीफळ व बुके देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

तसेच मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या एस.एस.सी.बोर्डाच्या परिक्षेत पहिले पाच विद्यार्थी व प्रत्येक विषयात प्रथम आलेल्या यशस्वी विद्यार्थ्यांना दानशूरंतर्फे रोख स्वरूपात दरवर्षी प्रमाणे बक्षीस वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संदीपभाऊ मवाळ, नवनाथ सोमवंशी,ज्ञानेश्वर तांदळे, अनिल बोरसे,दत्तात्रय घोटेकर, हनुमंत जाधव, पंडित राऊत, दीपक आहेर , आकाश मवाळ, किरण जाधव, विकी मासरे, सागर कांदळकर , विठोबा मवाळ,गोकुळ जाधव ,योगेश चव्हाण,निलेश चव्हाण, विठ्ठल जाधव, आबासाहेब सोनवणे, नाना चव्हाण,वाल्मिक कांदळकर व संदीपभाऊ मवाळ मित्र मंडळाचे अनमोल सहकार्य लाभले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयाचे जेष्ठ शिक्षक संजय कांदळकर, अमिता पारखे व पुनम घाडगे यांनी केले तर सुंदर असे फलक लेखन विद्यालयाचे कलाशिक्षक लक्ष्मण जाधव यांनी केले. विद्यालयाचा विद्यार्थी पृथ्वीराज तांदळे याने अतिशय सुंदर असे संचलन करून अतिथींना रिपोर्टिंग व राष्ट्रध्वजाला सलामी दिली तर विद्यार्थीनींनी अतिशय मनमोहक व सुंदर रांगोळ्यांनी शालेय परिसर सुशोभित केला. विद्यालयाच्या संगीत पथकाने बहारदार सादरीकरण करून सर्व ग्रामस्थांचे लक्ष वेधून घेत वाहवा मिळवली.

कार्यक्रमास गाव व पंचक्रोशीतील विविध क्षेत्रातील मान्यवर व ग्रामस्थ आणि पालक तसेच माजी विद्यार्थी संघ, सखी सावित्री समिती, विद्यार्थी सुरक्षा व विकसन समिती, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक माननीय काशिनाथ गवळी सर यांच्या मार्गदर्शनाखाली संजय कांदळकर, कैलास पठाडे, लक्ष्मण जाधव, उत्तम सोनवणे, संदीपभाऊ मवाळ, अमिता पारखे, पुनम घाडगे, आबासाहेब सोनवणे आदींनी मनापासून प्रयत्न केले.

# राष्ट्रीय समाज पक्षाच्या नाशिक जिल्हा युवक संघटक पदी रामदास बाचकर यांची नियुक्ती

**दै. आवाज वृत्तसेवा...**

माजी मंत्री महादेव जानकर यांचे खंदे समर्थक अत्यंत विश्वासू अशी ओळख असणारे सदैव सामान्य माणसाच्या व युवकांचा हक्कांसाठी लढा देणारे व सर्व युवकांचा अडी अडचणींत धावुन जाणारे सामान्य माणसांचे व युवकांचे प्रश्न आक्रमक पणे मांडणारे अशी ओळख असलेले सलग ६ वर्षे पक्षांशी एकनिष्ठ राहिलेले रामदास बाचकर अनेक वर्षे नि: स्वार्थी पणे काम करत आहेत सुरूवातीला पक्षाकडून नांदगाव मालेगाव संघटक प्रमुख त्यानंतर दिंडोरी लोकसभा युवक अध्यक्ष तसेच युवक विधानसभा अध्यक्ष नांदगाव व नाशिक जिल्हा, युवक सचिव तीन चार वेळा जबाबदारी देण्यात आली अश्या जबाबदारी देण्यात आल्या होत्या.

त्यांनी योग्य प्रकारे पार पाडल्या होत्या त्याच बरोबर पक्षाचा अडचणीच्या



काळातही पक्षाशी एकनिष्ठ राहिल्याने व माजी मंत्री महादेवजी जानकर यांच्या जन स्वराज्य यात्रेनिमित्त नांदगाव विधानसभा दौऱ्यात चांगली कामगिरी बजावली होती महादेवजी जानकर यांचे अत्यंत विश्वासू अशी तालुकेत ओळख आहे.

नुकत्याच युवा जोडो संकल्प अभियान बैठकीत राष्ट्रीय समाज पक्षाचे युवक प्रदेशाध्यक्ष अजितदादा पाटील व पक्षाचे मुख्खमहासचिव ज्ञानेश्वर माऊली सलगर यांच्या हस्ते पक्षाकडून जिल्हा युवक संघटक पदी निवड करण्यात आली व नियुक्ती पत्र देण्यात आले या निवडीची सर्व स्तरावरुन कौतुक केले जात आहे

# नाग पुजा

नाग पंचमी सणाला
भाऊ मानते नागाला
भारतीय नारी संपन्न
संस्कृती सांगे जगाला

साप नाग मित्र सारे
हवेआतां वाचवायला
निमीत्त नाग पंचमीचे
सत्य मिळे सुचवायला

नाग डसत नाही मुळी
आणतो तया रागाला
शेपटीवरी पडता पाय
उद्युक्त होतो डसायला

भाकडकथा नको त्या
खतपाणी अंधश्रध्देला
डूख धरत नसतो मुळी
विराम दे अशा स्पर्धेला

माहिती नाग सापांची
कळावी नव्या पिढीला
सणसाजरे डोळसपणे
जरुरी आजचे घडीला

बळीराजाचा मित्रसार्थ
सिध्द भगिनीरक्षणाला
म्हणूनचं संस्कृतआली
सुहास्यमुखेऔक्षणाला

प्राणअभय प्राणीमात्रा
शिकूआपण जगायला
रे सणसत्व तत्व पवित्र
शिकवी भले वागायला

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६..

# कोळपेवाडीत विविध उपक्रमांनी स्वातंत्र्य दिन साजरा

**दै. आवाज वृत्तसेवा...**

कोळपेवाडी प्रतिनिधी:-
कोपरगाव तालुक्यातील कोळपेवाडी परिसरात स्वतंत्र भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिन तिरंग्याला सलामी देत मोठ्या उत्साहात साजरा झाला जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोळपेवाडी येथे ग्रामपंचायत सदस्य सुखदेव बाबुराव कोळपे यांच्या हस्ते हजारोहण करण्यात आले.

जिल्हा परिषद प्राथमिक व उर्दू शाळा व चांगदेव बारकू कोळपे माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी हातामध्ये तिरंगा घेत गावामध्ये संयुक्त प्रभात फेरी काढून देशभक्तीपर घोषणा देत नागरिकांमध्ये नवचैतन्य निर्माण केले.

संसदेने नुकत्याच पारित केलेल्या वंदेमातरम राष्ट्रगीत व राज्य गीताने राष्ट्रीय ध्वजाला सलामी देण्यात आली कोळपेवाडी पोलीस औट पोस्ट येथे ए पी आय धरमसिंग सुंदर डे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले डॉ. प्रकाश कोळपे नॉलेज सिटी येथे संस्थापक डॉ.




प्रकाश कोळपे यांच्या हस्ते ध्वजारोहण पार पडले. अहिल्यादेवी ग्रामपंचायत भवन कार्यालया समोरील बाजारतळ प्रांगणात उपसरपंच सौ सुनिता कोळपे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तर चांगदेवराव बारकुजी पा. कोळपे विविध कार्यकारी सोसायटी येथे माजी चेअरमन भाऊसाहेब कोळपे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले तर संजीवनी ग्रामीण शिक्षण संस्था संचलित चांगदेवराव बारकू कोळपे माध्यमिक विद्यालयात विजय चिमाजी कोळपे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी ग्रांमस्थ विविध संस्थांचे पदाधिकारी ग्रामपंचायत सदस्य संचालक शिक्षक विद्यार्थी मोठ्या संख्येने हजर होते.




वाढदिवस शुभेच्छा, जुने/नवे वाहन खरेदी/विक्री, घर/
जमीन खरेदी विक्री, उद्‌घाटन सोहळा तसेच
आपल्या फर्मची जाहिरात करा सवलतीच्या दरात
* संपर्क * ९५४५१ १०१७७